# यशच्या उपचारासाठी दहा हजार रूपयांची मदत

पनवेल(प्रतिनिधी) अपघातात डोळयाला गंभीर इजा झालेल्या यश म्हात्रे या ११ वर्षीय बालकाच्या उपचारासाठी आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय व नगरसेवक राजू सोनी यांच्या प्रयत्नातून अभिनेता सलमान खान यांच्या बिईंग हयुमन ट्रस्टच्या माध्यमातून दहा हजार रूपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.

उरण तालुक्यातील गोवठणे गावातील यश कैलास म्हात्रे याच्या डोळयाला एका अपघातात गंभीर इजा झाली असून त्याच्यावर पनवेल येथील लक्ष्मी आय हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहे. शनिवार दिनांक २२ नोव्हेंबरला यशच्या डोळयावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. त्याच्या उपचाराकरिता आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय व नगरसेवक राजू सोनी यांच्या प्रयत्नातून अभिनेता सलमान खान यांच्या बिईंग हयुमन ट्रस्टच्या माध्यमातून दहा हजार रूपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. मदतीचा धनादेश यशचे वडिल कैलास म्हात्रे यांच्याकडे आमदार प्रशांत ठाकूर जनसपर्क कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी के.जी.म्हात्रे व मध्य रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य श्रीकांत बापट यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नेते अनंत सिंगासने, युवा नेते पवन सोनी आदी उपस्थित होते.